# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 07 January 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक ०७ जानेवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- देशभरात आतापर्यंत पाच अर्भकांना एचएमपीव्ही विषाणूची लागण, राज्यसरकार लवकरच मार्गदर्शक सूचना जारी करणार असल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती
- रेल्वेच्या प्रगतीमुळे विकसित भारताचं उद्दिष्ट लवकर पूर्ण होईल – पंतप्रधानांचं प्रतिपादन
- छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांनी केलेल्या भूसुरंग स्फोटात आठ सैनिकांना वीरमरण
- मस्साजोग हत्येप्रकरणी सर्वपक्षीय शिष्टमंडळाकडून राज्यपालांना निवेदन सादर

आणि

- तुळजाभवानी देवीच्या शाकंभरी नवरात्र महोत्सवाला आजपासून सुरुवात, ११ तारखेला जलकुंभ यात्रा

****

देशात पाच रुग्णांना एच एम पी व्ही या विषाणूची लागण झाली आहे. यामध्ये कर्नाटकात तीन आणि आठ महिन्यांच्या अर्भकांना, गुजरातमध्ये अहमदाबाद इथं दोन महिन्याच्या बालकाला, तर तामिळनाडूमध्ये चेन्नई आणि सालेम इथं या विषाणूचे रुग्ण सापडले असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं सांगितलं.

कर्नाटकात आढळलेल्या तीन महिन्याच्या अर्भकाला रुग्णालयातून सुटी देण्यात आली असून, आठ महिन्याच्या अर्भकावर अद्याप उपचार सुरू आहेत.

दरम्यान, हा एक सामान्य श्वसन आजार असून, यात सर्दी आणि तापाची लक्षणं दिसून येतात. या आजाराचा विषाणू श्वसनमार्गाच्या वरील भागातल्या संसर्गास

कारणीभूत ठरतो. या अनुषंगानं केंद्रीय आरोग्य विभागानं एक परिपत्रक जारी केलं आहे. हा कोणता नवीन विषाणू नसल्याचंही स्पष्ट करण्यात आलं आहे.

याबाबत आवश्यक दक्षता घेण्यात येत असून, नाहक भीतीचं वातावरण निर्माण करण्याची गरज नसल्याचं, आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे. नागरिकांनी खोकला किंवा शिंक येतांना रुमालाचा वापर करावा, सार्वजनिक ठिकाणी जाणं टाळावं, सॅनिटायझर किंवा साबणाने हात स्वच्छ धुवावेत, हस्तांदोलन टाळावं, तसंच आजारी लोकांच्या संपर्कात येणं टाळावं, असं आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे.

महाराष्ट्रात आतापर्यंत या संसर्गाचा एकही रुग्ण आढळला नसल्याचं राज्य आरोग्य सेवा संचालनालयानं कळवलं आहे. नागरिकांनी याबाबत घ्यावयाच्या काळजीसंदर्भातल्या सूचनांचं पालन करण्याचं आवाहन आरोग्य विभागानं केलं आहे.

दरम्यान, या आजारासंदर्भात राज्यसरकार लवकरच मार्गदर्शक सूचना जारी करेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. ते म्हणाले:

> ***‘‘प्राथमिक माहितीनुसार हा व्हायरस नवीन नाहीये. यापूर्वी देखील हा व्हायरस आलेला आहे. पुन्हा त्या व्हायरसचा चंचूप्रवेश होताना दिसतो आहे. यासंदर्भात जी काही ॲडव्हायजरी आहे, ती आम्ही लवकरच जारी करू.’’***

नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता आरोग्य विभागाच्या सूचनांचं पालन करावं आणि स्वत:ची काळजी घ्यावी, असं आवाहन सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केलं आहे.

****

रेल्वेच्या प्रगतीमुळे विकसित भारताचं उद्दिष्ट लवकरच पूर्ण होईल असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्धाटन काल मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून झालं, त्यावेळी ते बोलत होते. विविध चार निकषांच्या आधारावर रेल्वेचा विकास करत असल्याचं पंतप्रधानी नमूद केलं. ते म्हणाले..

> ***‘‘भारत मे रेलवे के विकास को हम चार पॅरामिटर्स पर आगे बढा रहे है। पहला रेलवे के इन्फ्रास्ट्रक्चर का मॉडर्नायझेशन। दुसरा रेलवे के यात्रियों को आधुनिक सुविधा। तीसरा रेलवे की देश के कोने कोने में***

***कनेक्टीव्हीटी। चौथा रेलवे से रोजगार का निर्माण, उद्योगों को सपोर्ट।''***

****

छत्तीसगड मधल्या विजापूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी केलेल्या भूसुरंगाच्या स्फोटात आठ सुरक्षा सैनिक आणि चालक ठार झाले. पंधरा जणांच्या जिल्हा राखीव रक्षक दलाची तुकडी, संयुक्त कारवाईनंतर काल दंतेवाडा इथून वाहनानं परतत असताना कुत्रु–बेद्रे रस्त्यावर नक्षलवाद्यांनी भूसुरुंगाचा स्फोट केला. स्फोटानंतर नक्षलवाद्यांनी सुरक्षा सैनिकांवर गोळीबार सुरू केला. या घटनेत पाच सैनिक जखमी झाले असून, त्यापैकी तिघांची प्रकृती चिंताजनक आहे.

****

बीड जिल्ह्यात मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी सर्वपक्षीय नेत्यांच्या शिष्टमंडळानं काल राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांची भेट घेतली. तपास पूर्ण होईपर्यंत मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा, वाल्मिक कराड यांच्यावर हत्येचा गुन्हा नोंदवावा, तसंच तपास पथकात निष्पक्ष अधिकाऱ्यांचा समावेश करण्याची मागणी शिष्टमंडळानं यावेळी राज्यपालांकडे केली. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, आमदार संदीप क्षीरसागर, माजी खासदार छत्रपती संभाजीराजे यावेळी उपस्थित होते.

****

दरम्यान, मंत्री धनंजय मुंडे यांनी माध्यमांशी बोलतांना, यासंदर्भात प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे. तपास संस्था त्यांचं काम योग्यप्रकारे करत असून, त्याबद्दल बोलणं योग्य ठरणार नाही, असं मुंडे म्हणाले...

***''सर्व चौकशा नेमलेल्या आहेत. त्या तपासामध्ये ज्यावेळेस माझ्याकडे संशयानं बघितलं जातं, मी त्यावर बोलणं काही उचित नाही. आणि अतिशय व्यवस्थित तपास त्याठिकाणी चालू आहे. तपास पूर्ण होऊ द्या.''***

****

बीड इथं सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी जिल्ह्याची होणारी बदनामी थांबण्यासाठी लढा उभा करू, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते अविनाश नाईकवाडे यांनी मांडली आहे. धनंजय मुंडे यांच्यावर जाणीवपूर्वक आरोप केले जात

असल्याची टीका त्यांनी केली. हिंसेचं वातावरण तसंच जातीवाद थांबला पाहिजे, तसंच दोषींना फशीची शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी नाईकवाडे यांनी केली.
दरम्यान, संतोष देशमुख हत्या प्रकरणी जयराम चाटे, महेश केदार, प्रतीक घुले आणि विष्णू चाटे या चौघांची पोलीस कोठडी काल संपली. त्यांना केज न्यायालयात हजर केलं असता, न्यायालयानं विष्णू चाटे याच्या पोलीस कोठडीत चार दिवसांची तर इतर तीन आरोपीच्या कोठडीत बारा दिवसांची वाढ केली आहे.

****

बीड शहरात काल संविधान बचाव मोर्चा काढण्यात आला. परभणी इथल्या घटनेचा निषेध व्यक्त करत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या विरोधातही यावेळी घोषणाबाजी करण्यात आली. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येला जबाबदार असलेल्या पोलिसांवर गुन्हे दाखल करण्यासह अन्य मागण्या यावेळी करण्यात आल्या.

****

दर्पण दिन काल साजरा झाला. मराठीतले आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेल्या दर्पण या पहिल्या मराठी वृत्तपत्राचं स्मरण म्हणून हा दिवस साजरा केला जातो.
नवी दिल्ली इथं महाराष्ट्र परिचय केंद्रात `मराठी पत्रकार दिन` साजरा करण्यात आला. उपसंचालक अमरज्योत कौर अरोरा यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.
मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे पत्रकार पुरस्कार काल जाहीर झाले. राज्यात प्रतिष्ठेचा कृ. पां. सामक जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी यांना जाहीर झाला आहे. मुद्रित माध्यमाचा राज्यस्तरीय पुरस्कार दैनिक लोकमत `सातारा`च्या प्रतिनिधी प्रगती पाटील यांना, वृत्तवाहिनीचे उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार एबीपी माझा`चे पुणे प्रतिनिधी मंदार गोंजारी यांना तर वार्ताहर संघाचा उत्कृष्ट सदस्य पुरस्कार `दैनिक पुढारी`चे राजन शेलार यांना जाहीर झाला आहे.
बीड जिल्हा माहिती कार्यालय तसंच जालना जिल्हाधिकारी कार्यालयात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

छत्रपती संभाजीनगर इथं अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने प्रसारमाध्यमात कार्यरत १५१ जणांचा काल गौरव करण्यात आला. तर धाराशिव इथं जिल्हा पत्रकार संघाच्या वतीनं पत्रकार आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आलं.

****

तुळजापूरच्या श्री तुळजाभवानी मातेची मंचकी निद्रा संपून आज पहाटे सिंहासनावर प्रतिष्ठापना करण्यात आली. आज दुपारी बारा वाजता घटस्थापनेने शाकंभरी नवरात्र महोत्सवाची सुरुवात होणार आहे. या महोत्सवात प्रमुख मानली जाणारी जलकुंभ यात्रा ११ जानेवारीला काढण्यात येणार असून, शाकंभरी नवरात्र महोत्सवाच्या काळात देवीच्या विविध अलंकार महापूजा मांडण्यात येणार आहेत.

****

नागरिकांना लोककल्याणकारी योजनांचा तत्परतेने लाभ मिळावा यासाठी शासनाच्या योजना परभणी जिल्ह्यात प्रभावीपणे राबवाव्यात, असे निर्देश राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले आहेत. काल परभणी इथं जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. जिल्ह्यात विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठीच्या रुग्णवाहिकांचं बोर्डीकर यांच्या हस्ते काल लोकार्पण करण्यात आलं, टीबीमुक्त भारत अभियानाच्या जनजागृतीपर वाहनाला त्यांनी हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं.

****

शासकीय योजना जनतेपर्यंत परिपूर्ण रीतीने पोहचल्या पाहिजेत, याकरिता प्रशासनाने समिती स्थापन करावी, आणि गावोगावी शिबीरं घेऊन लाभार्थींना मार्गदर्शन करावं, असं बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी म्हटलं आहे. ही सूचना देणारं पत्र क्षीरसागर यांनी, तहसीलदार, गटविकास अधिकारी तसंच कृषी अधिकाऱ्यांना पाठवलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या गोविंदभाई श्रॉफ संगीत महोत्सवाचा काल समारोप झाला. उदयोन्मुख गायिका युगंधरा केचे हिच्या शास्त्रीय गायनानं कार्यक्रमाला प्रारंभ झाला. दुसऱ्या सत्रात युवा गायक प्रथमेश लघाटे आणि मुग्धा वैशंपायन यांनी सादर केलेली विविध गाणी, आणि विघ्नेश जोशी यांचं खुमासदार निवेदन याला रसिकांनी भरभरून दाद दिली.

****

लातूर इथं सुरू असलेल्या २० व्या नांदेड परिक्षेत्रीय पोलिस क्रीडा स्पर्धांचा आज समारोप होत आहे. या चार दिवसीय स्पर्धांमध्ये हॉकी तसंच जलतरण आदी स्पर्धेत लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोलीच्या पोलीस खेळाडू सहभागी झाले आहेत.

****

नांदेड-मनमाड-नांदेड डेमू रेल्वे नांदेड ते पूर्णा दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. आजपासून ते ३१ जानेवारी दरम्यान ही गाडी पूर्णा ते मनमाड अशी धावेल.

****